MHWS100013942023

**संक्षिप्त फौ.ख.क्र. ७७८/२०२३**

**सरकार वि. भागवत**

**नि.क्र. ०५ वर पुढे सुरु**

## न्यायनिर्णय

(दिनांक २५/०५/२०२६ रोजी पारित)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ च्या कलम ६५ (ई) नुसार शिक्षा पात्र गुन्ह्याकरिता अभियोगपक्षातर्फे दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of offence) | १०/०७/२०२३ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | १०/०७/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of Chargesheet) | १०/०८/२०२३ |
| दोषारोप/प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge/Particular) | ०५/०२/२०२६ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक (Date of commencement of Evidence) | २७/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक (Date on which Judgment is reserved) | युक्तीवाद ऐकल्यानंतर तात्काळ न्यायनिर्णय देण्यात आला. |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of the Judgment) | २५/०५/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of sentencing Order, if any) | – |

| अ.क्र. (Rank of the accused) | आरोपीचे नाव (Name of accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of release on bail) | कलम (Offence charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentenced imposed) | न्यायाधीन बंदी असल्याची तारीख कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भागवत नथ्थुजी ससाने | अटक नाही | ०५/०२/२०२६ | मुंबई दारुबंदी कायदा, कलम ६५ (ई) प्रमाणे | निर्दोष | – | – |

२. सदर खटल्यातील तथ्ये, साक्ष आणि पुरावा इत्यादीचे अवलोकन केल्यानंतर माझ्यासमक्ष निर्णयाकरिता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष व समर्थनार्थ कारणे मी खालीलप्रमाणे नमूद केलेले आहेतः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, दिनांक १०/०७/२०२३ रोजी संध्याकाळी ०६.५० वाजताच्या सुमारास आरोपीच्या घरी, मौजा तरोडी, ता. मालेगांव, जि. वाशिम येथे आरोपीच्या ताब्यातुन भिंगरी संत्रा कंपनीच्या दारुने भरलेले १८० मिली क्षमतेच्या ०९ सीलबंद बाटला विना परवाना व अवैधरित्या मिळून आले होते काय ? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची सुटका. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिता :–**

३. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फक्त एकच साक्षीदार तपासण्यात आला. पंच साक्षीदार क्र.१ सुरेश उध्दव कंकाळ याची साक्ष नोंदविण्यात आली.

४. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.एम.एस.सुपारे आणि आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.के.डी.चतरकर यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. पंच साक्षीदार क्र.१ सुरेश कंकाळ याने त्याच्या सरतपासणीत असे कथन केले की, तो आरोपीला ओळखत नाही. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, पोलीसांनी त्याला पंचनाम्याकरिता कोठेही बोलाविले नव्हते. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, पोलीसांनी त्याच्यासमक्ष कोणताही पंचनामा तयार केला नव्हता. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, पोलीसांनी त्याच्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नव्हते. सदर साक्षीदाराने घटनास्थळासह जप्ती पंचनाम्यावरील सही मान्य केली; परंतु त्यातील मजकूर नाकारला. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना त्याची उलटतपासणी घेण्याची परवानगी दिली; परंतु अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांची त्याने नकारार्थी उत्तरे दिली. सबब, सदर साक्षीदाराची साक्ष ग्राह्य धरता येत नाही.

६. आरोपीविरुध्द कलम ६५ (ई) मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ अन्वये गुन्हा सिध्द करण्याकरिता आरोपीने अधिनियमातील तरतुदीचे, आदेशाचे, परवानापत्राचे उल्लंघन करुन कोणताही

मादक द्रव्य (अफू व्यतीरिक्त) सेवन करुन, वापर करुन, बाळगून शिक्षापात्र गुन्हा केला आहे, असे अभियोगपक्षाने सिध्द केले पाहिजे.

७. संबंधित पोलीस स्टेशनमार्फत रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केलेला नाही.

८. अभियोगपक्षाने तपासी अधिकाऱ्यास तपासले नाही त्यामुळे त्यांनी जप्त केलेल्या देशी दारुचा नमुना रासायनिक विश्लेषणाकरिता केव्हा पाठविला याबाबत स्पष्टता होत नाही. तसेच सीलबंद करताना सर्व कायदेशीर आवश्यक तरतुदीचे पालन केले किंवा नाही हे अभिलेखावरुन स्पष्ट होत नाही त्यामुळे जप्त केलेल्या देशी दारुचा नमुना रासायनिक परिक्षणाकरिता पाठवले व न आलेला अहवाल नेमका आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेल्या देशी दारुबाबतचा आहे हे सिध्द होत नाही.

९. जप्त करण्यात आलेले द्रव्य हे देशी दारु होते किंवा नव्हते हे सिध्द होण्याकरिता रासायनिक विश्लेषण अहवालाची मदत होते. पंच साक्षीदाराचा मौखिक पुरावा अभिलेखावर उपलब्ध आहे; परंतु पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत न केल्यामुळे त्याचा पुरावा ग्राह्य धरता येणार नाही. आरोपीविरुध्दचा आरोप वाजवी संशयाच्या पलीकडे सिध्द करणे हे अभियोगपक्षाची जबाबदारी आहे. अभियोगपक्ष आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यास अयशस्वी झाले त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे.

१०. थोडक्यात वरील चर्चेअंती मी या निष्कर्षास आलो आहे की, आरोपीविरुध्द असलेला आरोप सिध्द होण्याकरिता पुरेसा विश्वसनीय पुरावा अभिलेखावर आलेला नाही. घटनेच्या दिवशी आरोपीच्या ताब्यातुन अनधिकृतपणे कोणते मादक द्रव्य (भिंगरी संत्रा कंपनीच्या दारुने भरलेले १८० मिली क्षमतेच्या ०९ सीलबंद बाटला) आढळले हे अभियोगपक्षाने सबळ पुरावा देवून सिध्द करु शकले नाही. आरोपीविरुध्द आरोप सिध्द झालेला नाही. सबब, आरोपी सुटण्यास पात्र आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले भिंगरी संत्रा कंपनीच्या देशी दारुने भरलेले १८० मिली क्षमतेच्या ०९ सीलबंद बाटला अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावेत. वरील सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५ (१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) नुसार शिक्षा पात्र असलेल्या गुन्हयाच्या आरोपातून सुटका करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक व जमानत पत्र रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपीने १५,०००/- रू. चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढ्याच रक्कमेचा जामीन मुचलका द्यावा.

४. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले भिंगरी संत्रा कंपनीच्या देशी दारुने भरलेले १८० मिली क्षमतेच्या ०९ सीलबंद बाटला अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावेत.

[न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.]

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.05.25 15:01:45 +0530

दिनांकः- २५/०५/२०२६.

मोहम्मद वसिम अक्रम
पि.मोहम्मद जलाल शेख
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.१), मालेगांव.

## सूची–I

अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. अभियोगपक्षाचे साक्षीदारः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१–नि.क्र.०५ वर पुढे | सुरेश उध्दव कंकाळ | घटनास्थळासह जप्ती पंच |

ब. आरोपीचे साक्षीदार, असल्यासः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यासः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी

अ. अभियोगपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ०६ | घटनास्थळासह जप्ती पंचनामा |

ब. आरोपीः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ड. मुद्देमालः–**

| अ.क्र. | वस्तू/आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.05.25 15:02:00 +0530

दिनांकः २५/०५/२०२६.

मोहम्मद वसीम अक्रम
पि. मोहम्मद जलाल शेख
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.१), मालेगांव.

## CERTIFICATE

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | C. R. Lande (Grade III ) |
| Name of Court | **Shri. M. W. A. M. J. Sheaikh,**<br>C.J.J.D. & J.M.F.C., (Court No.1), Malegaon, Distt. Washim. |
| Date of Dictation | 25/05/2026 |
| Judgment/Order signed by the PO on | 25/05/2026 |
| Judgment /Order uploaded on | 25/05/2026 |